महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १२६ वा | दिनांक : ११/०२/२०२५ | वार : मंगळवार

## ममता कुलकर्णी यांनी महामंडलेश्वर पद सोडले



**प्रयागराज :** किन्नर आखाड्यातील वादाच्या पार्श्वभूमीवर ममता कुलकर्णी यांनी महामंडलेश्वर पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट करून याची घोषणा केली.

ममता म्हणाल्या, आज किन्नर आखाड्यात माझ्याबद्दल वाद सुरू आहे. त्यामुळे मी राजीनामा देत आहे. मी २५ वर्षांपासून साध्वी आहे आणि भविष्यातही साध्वी राहीन.

महामंडलेश्वर बनलेल्या ममतांवर १० कोटी रुपये देवून ही पदवी घेतल्याचा आरोप होत होता. २४ जानेवारी रोजी प्रयागराज महाकुंभात ममता कुलकर्णी यांना महामंडलेश्वर ही पदवी देण्यात आली. संगमात स्नान केल्यानंतर त्यांचे पिंडदान करण्यात आले. यानंतर, आखाड्याचे आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांनी त्यांचा पट्टाभिषेक केला. त्यांचे नवीन नाव श्रीयमाई ममता नंद गिरी असे ठेवण्यात आले. त्या सुमारे ७ दिवस महाकुंभात राहिल्या.

ममता कुलकर्णी यांनी व्हिडिओमध्ये म्हटले आहे की, मी, महामंडलेश्वर यमाई ममता नंद गिरी, माझ्या पदाचा राजीनामा देत आहे. आज, किन्नर आखाड्यात माझ्याबाबत काही समस्या आहेत. मी २५ वर्षे साध्वी होते आणि नेहमीच साध्वी राहीन. मला महामंडलेश्वरांचा मान देण्यात आला. पण काही लोकांसाठी हे आक्षेपार्ह ठरले. मग ते शंकराचार्य असोत किंवा इतर कोणीही. मी २५ वर्षांपूर्वी बॉलिवूड सोडले होते.

मेकअप आणि बॉलिवूडपासून इतके दूर कोण राहते? पण मी २५ वर्षे तपश्चर्या केली. मी स्वतः बेपत्ता राहिले. मी हे का करते किंवा ते का करते याबद्दल लोक माझ्यावर प्रतिक्रिया देतात. नारायण, तर सर्व समृद्ध आहेत. सर्व प्रकारचे अलंकार परिधान करणारा तो एक महान योगी आहे, तो देव आहे. तुम्हाला दिसेल की कोणताही देव किंवा देवी कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या मेकअपने सजलेली असते आणि माझ्या आधी सगळे आले होते, सगळे याच मेकअपमध्ये आले होते.

ममता म्हणाल्या, एका शंकराचार्यांने सांगितले की, ममता कुलकर्णी दोन आखाड्यांमध्ये अडकली. पण, माझे गुरु स्वामी चैतन्य गगनगिरी महाराज आहेत. ज्यांच्या मार्गदर्शनाखाली मी २५ वर्षे तपश्चर्या केली आहे. मला त्यांच्या बरोबरीचे दुसरे कोणी दिसत नाही. माझे गुरु खूप उच्च आहेत. प्रत्येकाला अहंकार असतो. ते आपापसात भांडत आहेत. मला कोणत्याही कैलास किंवा हिमालयात जाण्याची गरज नाही. संपूर्ण विश्व माझ्यासमोर आहे.

ममता कुलकर्णी म्हणाल्या, ज्यांनी आज माझ्या महामंडलेश्वर होण्यावर आक्षेप घेतला आहे, मग ती हिमांगी असो किंवा इतर कोणीही असो, मी त्यांच्याबद्दल काहीही बोलणार नाही. या लोकांना ब्रह्मविद्याबद्दल काहीच माहिती नाही. मला फक्त एवढेच सांगायचे आहे की मी लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांचा आदर करते.

मी हिमांगी उमंगीला ओळखत नाही. हे सर्व कोण आहेत? पैशाच्या व्यवहाराबाबत, माझ्याकडे २ लाख रुपये मागितले गेले होते, पण मी महामंडलेश्वर आणि जगद्गुरूंसमोरील खोलीत सांगितले की माझ्याकडे २ लाख रुपये नाहीत. मग तिथे बसलेल्या महामंडलेश्वर जय अंबा गिरी यांनी लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांना त्यांच्या खिशातून दोन लाख रुपये दिले. याशिवाय चार कोटी आणि तीन कोटी देण्याची चर्चा आहे, पण मी काहीही केले नाही. मी २५ वर्षांपासून चंडीची पूजा करत आहे. त्यातूनच मला या सगळ्यातून बाहेर पडण्याचा संकेत मिळाला.

ममता कुलकर्णी यांना महामंडलेश्वर बनवल्यानंतर, पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री आणि योगगुरू बाबा रामदेव यांच्यासह अनेक संतांनी त्यांना विरोध केला. धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणाले होते- कोणत्याही प्रकारच्या बाह्य प्रभावाखाली येऊन कोणीही संत किंवा महामंडलेश्वर कसे बनू शकते? ही पदवी फक्त अशा व्यक्तीलाच दिली पाहिजे, ज्याच्या मनात संत किंवा साध्वीची भावना आहे.

योगगुरू बाबा रामदेव म्हणाले होते की कोणीही एका दिवसात संतपद मिळवू शकत नाही. त्यासाठी वर्षानुवर्षे साधना करावी लागते. आजकाल मी पाहतो की कोणालाही फक्त डोके धरून महामंडलेश्वर बनवले जाते. हे घडत नाही.

त्याच वेळी, किन्नर जगद्गुरू हिमांगी सखी आणि किन्नर आखाड्याचे संस्थापक असल्याचा दावा करणारे ऋषी अजय दास यांनीही निषेध नोंदवला. अजय दास यांनी दावा केला होता- मी लक्ष्मीनारायण त्रिपाठी आणि अभिनेत्री ममता कुलकर्णी यांना महामंडलेश्वर पदावरून काढून टाकले आहे. ममता यांना महामंडलेश्वर बनवताना प्रक्रिया पाळली गेली नाही, ज्यांच्यावर (ममता) देशद्रोहाचा आरोप आहे. त्यांना महामंडलेश्वर कसे बनवता येईल?

## उद्यापासून बारावी बोर्डाची परीक्षा



**मुंबई :** महाराष्ट्रात आता उद्यापासून दिनांक ११ फेब्रुवारीपासून बारावीच्या परीक्षा सुरू होणार आहेत. ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा होणार आहे. यंदाच्या वर्षी बारावीच्या परीक्षेला एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या एकूण संख्येपैकी ८ लाख १० हजार ३४८ मुले, तर ६ लाख ९४ हजार ६५२ मुली आहेत. या परीक्षेला ३७ तृतीयपंथी नागरिकांनी देखील नोंदणी केली आहे.

महाराष्ट्रात एकूण १० हजार ५५० कनिष्ठ महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. विज्ञान शाखेला ६८ हजार ९६७ विद्यार्थी, कला शाखेला तीन लाख ८० हजार ४१० विद्यार्थी, वाणिज्य शाखेला तीन लाख १९ हजार ४३९ विद्यार्थी तर किमान कौशल्य आधारित अभ्यासक्रम ३१ हजार ७३५ विद्यार्थी आहेत. टेक्निकल सायन्स ४ हजार ४८६ असे एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थी यंदा परीक्षा देणार आहेत, अशी माहिती माहिती मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

यावेळी बोलताना शरद गोसावी म्हणाले, पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळा अंतर्गत बारावीच्या परीक्षेला उद्यापासून सुरुवात होत आहे. यंदाच्या वर्षी बारावीची परीक्षा १० दिवस अगोदर होत आहे. ही परीक्षा लवकर घेतल्याने निकाल लवकर लागेल, १५ मे पर्यंत बारावी आणि दहावीचा निकाल लागण्याची शक्यता आहे.

पुढे बोलताना शरद गोसावी म्हणाले, परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा, या दृष्टीने मंडळामार्फत संपूर्ण राज्यात २७१ भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली. तर मागील पाच वर्षांच्या काळात ८१८ केंद्रावर सातत्याने गैरप्रकार आढळून आले आहेत. त्यामुळे ती सर्व केंद्र संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहे. त्याबाबत सांगायचे झाल्यास, पुणे १२५, नागपूर १०४, छत्रपती संभाजीनगर २०५, मुंबई ५७, कोल्हापूर ३९, अमरावती १२४, नाशिक ८८, लातूर ७३, कोकण ३ ही एकूण ८१८ केंद्र आहेत. या सर्वांवर विशेष लक्ष मंडळाचे असणार असल्याचे शरद गोसावी यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, राज्य शासनाकडून कॉपीमुक्त अभियनासाठी परीक्षा केंद्रावर ड्रोन फिरवले जाणार आहेत. परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेल्या केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधीत घटकांची एफसीआरव्दारे म्हणजे फेस रिडींगद्वारे तपासणी करण्यात येणार आहे. या बोर्ड परीक्षेत कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी बोर्डाकडून विशेष सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ फेब्रुवारी २०२५


## राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या उपाध्यक्षपदी छ.संभाजीनगरचे प्रा. रवींद्र जिगेपाटील



**जालना (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे)** : महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाची राज्य कार्यकारिणीची निवडणूक नुकतीच पुणे येथे संपन्न झाली असून, अध्यक्षपदी नाशिकचे प्रा.संजय शिंदे तर उपाध्यक्षपदी देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजी नगरचे प्रा. रवींद्र जिगे पाटिल यांची निवड करण्यात आली.प्रा. रवींद्र जिगे पाटील हे मूळचे जालना जिल्ह्यातील भूमिपुत्र असून मठपिंपळगाव येथील आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल जालना जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आनंद झाला आहे.

राज्य शासनाच्या मराठी भाषा समितीचे सदस्य प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे पाटील, ज्युक्टा कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुग्रीव वासरे, सचिव प्रा.परशुराम चौरे, उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड, डॉ. फुलचंद मोहिते, डॉ. अरविंद महाजन, डॉ. स्वप्नील सारडा, प्रा. समाधान पवार, प्रा. शिवनारायण ताठे, प्रा. महेश सोनी, प्रा. विजय शिंदे, प्रा. संतोष मुंदडा, प्रा. जगदीश मुळे, आदींनी स्वागत केले आहे. प्रा. रवींद्र जिगे पाटील यांची उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जालना जिल्ह्यातून शिक्षक वर्गातून आनंद व्यक्त होत आहे.

## प्राचार्य हरिदास विधाते यांना रंगकर्मी प्रतिष्ठानच्या शैक्षणिक पुरस्काराने सन्मानित



**मुरुम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले)** : दि. ८ फेब्रुवारी रोजी उदगीर येथे संपन्न झालेल्या ३ -या लोकसंस्कृती साहित्य संमेलनात आष्टी-कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाचे प्राचार्य हरिदास विधाते यांना रंगकर्मी प्रतिष्ठानचा शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तीस दिला जाणारा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी मंचावर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक इंद्रजित भालेराव, स्वागताध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, मराठवाडा साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, रमेश अंबरखाने, सिने अभिनेता चंद्रशेखर सांडवे, रंगकर्मी प्रतिष्ठान चे अध्यक्ष बिभीषण मद्देवाड,सौ.डॉ.मंगल हरिदास विधाते, डॉ. सत्यजीत हरिदास विधाते आदि मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य हरिदास विधाते हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर येथे व्यवस्थापन परिषदे बरोबरच त्यांनी शिक्षण क्षेत्रातही मोलाची कामगीरी बजावली आहे.त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार त्यांना त्यांना देण्यात आला आला आहे. हा मानाचा व प्रतिष्ठेचा दिला जाणारा पुरस्कार मिळाल्याबद्दल साहित्यिक कथाकार अंबादास केदार, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, लक्ष्मण बेंबडे, रसुल पठाण, ज्ञानेश्वर हंडरगुळीकर, यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## अमरावती विद्यापीठाचा अर्थसंकल्प येणार

**अमरावती** : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात येत्या ११ मार्चला अर्थसंकल्पीय अधिसभा होणार आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व विभागांकडून अर्थसंकल्पासाठी प्रस्ताव मागवण्यात आले आहेत.

विद्यापीठाचा गतवर्षीचा अर्थसंकल्प २९२ कोटी २१ लाख ८७ हजार ५९० रुपयांचा होता. विद्यापीठाला केंद्र सरकार, राज्य सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून नियमित अनुदान मिळते. याशिवाय महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांकडून विविध शुल्कांच्या माध्यमातून उत्पन्न मिळते. मात्र, गतवर्षी जमा आणि खर्च यांच्यात तफावत असल्याने तुटीचे अंदाजपत्रक सादर करावे लागले होते.

दरम्यान, जिल्हा परिषदेतही अर्थसंकल्पाची तयारी सुरू झाली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य वित्त व लेखाधिकारी अश्विनी मारणे यांनी १४ विभागांकडून मागणी प्रस्ताव मागवले आहेत. महिनाअखेरपर्यंत सर्व विभागांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सर्वसमावेशक अर्थसंकल्प तयार केला जाणार आहे.

## प्रख्यात कवी अजीम नवाझ राही मंगळवारी कन्नडकरांच्या भेटीला



**कन्नड (अरुण थोरात)** : स्वत:ची एक वेगळी वहीवाट निर्माण करून एक कुल्फी विक्रेता ते महाराष्ट्रातील प्रख्यात नामवंत कवी असा प्रवास करणारे अजीम नवाज राही मंगळवार दि. ११ फेब्रुवारी रोजी कन्नडकरां च्या भेटीस येत आहे. कन्नड शहरातील स्व.सौ.पूर्णाकाकू कोल्हे महिला प्रबोधिनी येथे स्व.पी. डी. केवट गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कवितांचा स्फूर्तीदाई प्रवास यावर आयोजित व्याख्यान, मार्गदर्शन तथा अभिवादन कार्यक्रमास ते येत आहे. अजीम नवाज राही यांचा महाराष्ट्र राज्यशासनाच्या इयत्ता ०९ वी,१०,वी, ११ वी च्या पाठयपुस्तकात कवितांचा समावेश आहे. तसेच राज्यातील तब्बल विविध ११ विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात त्यांच्या कविता संग्रहांचा समावेश करण्यात आलेला आहे. व्यवहाराचा काळा घोडा, कल्लोळातला एकांत, वर्तमानाचा वतनदार आणि तळमळीचा तळ आदी चार सकस, वस्तूनिष्ठ, खणखणीत कवितासंग्रह गाजलेले आहेत. राज्याच्या लेखणी आणि वाणी या दोन्ही क्षेत्रात आपला ठसा उमटवीला आहे.त्यांना अमेरिकेतील फॉउंडेशन, भारतातील केशव गोरे स्मारक ट्रस्ट मुंबई या साहित्य प्रांतातील अत्यंत प्रतिष्ठेचा महाराष्ट्र फाउंडेशन साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट बांगमय लेखणाचा कवी केशवसूत पुरस्कार यासह विविध ७० च्या वर मातबर पुरस्कार मिळालेले आहेत.

सदर कार्यक्रम मंगळवार दि.११ फेब्रुवारी रोजी शहरातील स्व.सौ पूर्णा काकु कोल्हे प्रबोधिनी येथे सायंकाळी साडे पाच वाजता असून अधिकाधिक नागरिक, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सोयाबीनची पोती देण्यासाठी रात्रीपर्यंत ठेवले ताटकळत : शेतकरी मुलीवर अन्याय

**यवतमाळ** : यवतमाळ जिल्ह्यातील एका शेतकरी मुलीला स्वत:चे सोयाबीन पोते घेण्यासाठी रात्र होईपर्यंत ताटकळत ठेवल्याचा प्रकार उघडकीस आला. पुसद वखार महामंडळाचे साठा निरीक्षक महेश पंजाबराव गिरी यांच्या प्रतापामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. दोषी साठा अधीक्षक महेश गिरी व सतीश जाधव यांच्यावर कठोर कारवाईची मागणी शेतकरी मुलीने जिल्हाधिकारी यांना तक्रारीतून केली आहे.

शहरातील वखार महामंडळाच्या गोदामात प्रकाश काळे या शेतकऱ्याने दीडशे क्विंटल सोयाबीन पोते ठेवले होते. ६ फेब्रुवारीला सोयाबीन खरेदीची नाफेडमार्फत शेवटची तारीख असल्याने त्यांची मुलगी ही सोयाबीन पोते घेण्यासाठी मालवाहू वाहन घेऊन गोदामाकडे गेली होती. मात्र, साठा अधीक्षक महेश गिरी यांनी वेळकाढू धोरण अवलंबले व असभ्य वर्तवणूक केली. शुक्रवारी ७ फेब्रुवारीला तुमचे माल नाफेडमार्फत खरेदी करून देतो, माझे नाफेड अधिकाऱ्यांशी बोलणे झाले आहे. असे सांगून कार्यालयातून काढता पाय घेतला. भ्रमणध्वनीसुद्धा बंद करून ठेवला. कार्यालयातील डाटा ऑपरेटर सतीश जाधव व अन्य कर्मचारी यांना शेतकरी मुलीने सोयाबीन पोते देण्याची विनंती केली. मात्र, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत असभ्य वागणूक दिली.

आपले सोयाबीन मिळेल या आशेने शेतकरी मुलगी गोदाम परिसरातच रात्री १० वाजेपर्यंत ताटकळत उभी होती. शेवटी निराश होऊन रात्री १०.३० वाजता ती घरी पोहोचली. साठा अधीक्षक महेश गिरी व डाटा ऑपरेटर सतीश जाधव, संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी मुलीने जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारीतून केली आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ फेब्रुवारी २०२५


## कन्नडच्या जैन बांधवांत संताप, पंचकल्याणक संस्कार झालेल्या भगवंताच्या ५ मूर्तींची चोरी

**कन्नड (राहुल थेटे) :** कन्नड शहरातील लष्कर दिगंबर जैन मंदिरातून भगवंताच्या पाच पंचधातूच्या मूर्ती चोरट्याने चोरून नेल्याची घटना शनिवारी (८ फेब्रुवारी) मध्यरात्री घडली. एकूण १७ मूर्ती होत्या, पैकी ५ चोरट्याने नेल्या. चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करून भगवान पार्श्वनाथ यांच्या तीन, भगवान मुनीसुव्रतनाथ, भगवान महावीर यांच्या प्रत्येकी एक मूर्ती चोरून नेल्या. रविवारी सकाळी पूजा, अभिषेक करण्यासाठी पुजारी आले असता त्यांना मूर्ती दिसून आल्या नाहीत. जैन बांधवांनी मंदिरात गर्दी केली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला.

कन्नड शहर पोलिसांनी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी करीत आहेत. पंचकल्याणक संस्कार झालेल्या मूर्तीशी जैन समाजबांधवांच्या भावना जुळलेल्या असतात. अशा पाच मूर्ती चोराने नेल्याने समाजबांधवांत संताप व्यक्त होत आहे, असे स्थानिक जैन समाज अध्यक्ष आनंदकुमार पांडे यांनी सांगितले.

## माझे लेकरू परत आणून देऊ शकता का? : सोमनाथच्या आईचा सुरेश धसांना सवाल

**परभणी :** सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणातील पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचा आग्रह करू नये, असे विधान भाजप आमदार सुरेश धस यांनी केले होते. यानंतर विरोधकांकडून सुरेश धस यांच्यावर जोरदार टीका करण्यात येत आहे. सुरेश धस यांच्या विधानावर सूर्यवंशी कुटुंबीयांनीही प्रतिक्रिया दिली. जर तुमच्या घरचा कोणी व्यक्ती गेला असता तर तुम्ही अशाच पद्धतीने माफ केले असते का? असा संतप्त सवाल सोमनाथच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी सुरेश धस यांना केला. सर्व दोषी पोलिस अधिकाऱ्यांना शिक्षा होऊन आम्हाला न्याय मिळणार नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, अशी भूमिका स्पष्ट केली.

सोमनाथ सूर्यवंशीच्या मृत्युच्या निषेधार्थ दलित संघटनांकडून परभणी ते मुंबई असा लॉन्ग मार्च काढण्यात आला होता. मात्र, हा लॉन्ग मार्च नाशिकमधूनच माघारी फिरला. भाजप आमदार सुरेश धस आणी मंत्री मेघना बोर्डीकर यांनी आंदोलकांशी चर्चा केल्यानंतर हा मार्च स्थगित करण्यात आला. यावेळी आंदोलकांशी बोलताना सुरेश धस यांनी पोलिसांची डिपार्टमेंटने चांगलीच कान उघडणी केली आहे. त्यामुळे गुन्हे दाखल व्हावे हा आग्रह धरु नये, अशी विनंती केली होती. यानंतर सोमनाथची आई विजयबाई सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषद घेत सूर्यवंशी कुटुंबीयांची भूमिका स्पष्ट केली.

आमदार सुरेश धस हे गरीबांचे कैवारी म्हणून मिरवतात मात्र ते तर गुंडाचे कैवारी झाल्याचे दिसत आहे. सोमनाथच्या मारेकऱ्यांना माफ करा असे सुरेश धस कसे काय म्हणू शकता? तुमच्या घरातील कोणी व्यक्ती गेला असता, तर तुम्ही अशाच पद्धतीने माफ केले असते का? असा संतप्त सवाल विजयबाई सूर्यवंशी व भाऊ अविनाश सूर्यवंशी यांनी सुरेश धस यांना केला.

तुम्ही आम्हाला मन मोठे करा म्हणता, पण आमचे मन छोटेच आहे, आम्ही गुन्हेगारांना अजिबात माफ करणार नाही. तुमचे चुकीचे बोलणे सहन करणार नाही. माझ्या पोटचे लेकरू गेले आहे. माझे लेकरू परत आणून देऊ शकता का? असा सवाल करत मी कोणत्याही पोलिसाला माफ करणार नाही, त्यांना मोकळे सोडणार नाही, असेही त्या म्हणाल्या.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी परभणीत लॉंग मार्च काढण्यात आला होता. येथील आंदोलनकर्त्यांना संबोधित करताना सुरेश धस यांनी म्हटलं की, "मला वाटतं पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी संयुक्तिक होणार नाही. या पोलिसांची डिपार्टमेंटने चांगलीच कान उघडणी केली आहे. त्यामुळे गुन्हे दाखल व्हावे हा आग्रह धरु नये. अर्थात कायद्याचा रस्ता तुम्हाला मोकळा आहे. मात्र संघर्ष न करता त्या पोलिसांनाही मोठ्या मनाने माफ करावं, अशी मी विनंती करतो."

परभणीत झालेल्या हिंसाचारामध्ये सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी राबवलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये सोमनाथ सूर्यवंशींना अटक केली होती. सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला होता. पोस्टमार्टमध्ये त्यांना दुखापत झाल्यामुळे मृत्यू झाला होता, स्पष्ट झालं होतं. त्यानंतर सूर्यवंशी कुटुंबियांनी न्यायाची मागणी केली. अमानुषपणे मारहाण करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी करण्यात येत आहे.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ९२ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.



**छत्रपती संभाजीनगर :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालयात मूकनायकच्या १०५ व्या वर्धापनदिनानिमित्त दैवावर भरोसा ठेवू नका, जे करावयाचे ते मनगटाच्या जोरावर करा. याच जन्मी सर्वांगीण उन्नती करायला हवी. या विषयावर ९२ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा २ फेब्रुवारी २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी.बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, संवैधानिक तरतुदी नुसार विज्ञानवादी, मानवतावादी भारतीय समाज तयार करण्यासाठी नेमके सत्य काय? यांचे संशोधन करण्यासाठी बुद्धिष्ट सेमिनरी चालविली पाहिजे. ज्यात या अनुषंगाने सर्व धर्माचा अभ्यास करून नेमके सत्य पुढे आणले पाहिजे. समाजात विज्ञान व अज्ञान यात संघर्ष आहे. तो दूर करण्यासाठी केवळ मलमपट्टी लावून चालणार नाही तर रोगाचे समूळ उच्चाटन करणारे जालीम लोशन वापरून औषधोपचार करावे लागेल. जेणेकरून भारताचे संविधानानुसार अपेक्षित मानवीय सभ्य समाज निर्माण होऊ शकेल.

समाजाच्या सर्वांगीण उन्नती साठी दैवावर भरोसा ठेवून चालणार नाही तर आपणास स्वत:च्या मनगटाच्या बळावर आपले हक्क अधिकार सरळ मार्गाने मिळत नसतील अशा वेळी प्रस्थापित व्यवस्थेकडून हिसकावून घेण्यासाठी आवश्यक उपाय योजनांची अंमलबजावणी केली पाहिजे. करिता प्रवाहाच्या विरुद्ध कार्य करावे लागेल. प्रवाहाच्या विरुद्ध कार्य करणाऱ्यास खरा समाज प्रेमी, देश प्रेमी असे म्हटले पाहिजे. यासाठी त्यांनी आपल्या इच्छा आकांक्षांचा बळी दिलेला असतो. आम्ही भारताचे लोक याची जाणीव ठेवून आपण सर्वांनी एकजिनसी भारतीय समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. करिता जनतेला सजग करण्यासाठी समाज जीवनात अशा प्रकारच्या सेमिनार, कार्यशाळा यांचे सातत्याने आयोजन करीत राहिले पाहिजे. जेणेकरून फुले शाहू आंबेडकरासह सर्व परिवर्तनवादी महापुरुषांच्या विचारांचा समाज जीवनात प्रचार प्रसार होऊ शकेल.

याप्रसंगी उद्घाटक सुभाष ठोकळ म्हणाले की, तर्कशीलता वापरून आपण स्वत:ला आव्हान दिले पाहिजे. प्रस्थापित व्यवस्था कायम ठेवण्यासाठी मनुवादी सातत्याने प्रयत्नशील असतात. आजही समाजात लोक विज्ञानाचा वापर करून अज्ञानाची पुजा करतात. फुले आंबेडकरवादाचे स्वयंघोषित अनुयायी ब्राह्मणवादाचे बटीक होत असल्याने गुलामीत ढकलले जात आहेत. आरक्षणाच्या बळावर व्यवस्थेत गेलेल्या प्रतिनिधिंनी जनतेसाठी इमानेइतबारे कार्य करणे अपेक्षित आहे.

प्रमुख वक्ते प्रतीक पंचशील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनाचा उद्देश स्वत:सह समाजाचा विकास करणे हा होता. संघटनेत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास कुटुंबीय व नातेवाईक अडचणी निर्माण करीत असतात जे स्वत: काही करीत नसतात व इतरांना सुद्धा काही करू देत नसतात. म्हणून ज्यांना प्रेरणा मिळाली त्यांनी समाजाला दिशा देण्यासाठी तन मन धनाने कार्य करावे. ज्याची समाजाला आवश्यकता आहे. मेंदूच्या पलीकडील म्हणजे देव आणि दैवावर विश्वास ठेवून चालणार नाही.

याप्रसंगी उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, आपल्या समाजाच्या नेमक्या काय समस्या आहेत? हे सुद्धा त्यांना मांडता येत नाहीत. समस्यांचे आकाश फाटलेले असल्याने आपण थिगळ कुठे लावणार आहोत? म्हणून संघटनेत मनुष्यबळ निर्माण केले पाहिजे. आपण सर्वांनी जबाबदारीने पुढील पिढीसाठी कार्य केले पाहिजे. डी. आर. गायकवाड म्हणाले की, प्रयत्न करणाऱ्यास न मिळणारी वस्तू सुद्धा मिळत असते. गोविंद कांबळे म्हणाले की, निसर्ग हाच देव आहे असे समजून निसर्गाची पुजा केली पाहिजे. शैलेंद्र मिसाळ म्हणाले की, सर्व देवांना पायाखाली तुडवून मनगटाच्या जोरावर पुढे जाण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. आंबेडकर चळवळीचे कार्य कुणी चालवायचे? विहारे ओस का पडत चालललीत? अशा कार्यशाळा वस्ती वस्तीत झाल्या पाहिजेत. अशोक मेश्राम म्हणाले की, कार्य केले तर आपणास निश्चित फळ मिळेल. बुद्ध धम्माचा दीक्षा समारंभ नागपूरात झाल्याने तिकडील बौद्धांनी बहुतांश अंधश्रद्धा सोडून दिल्याने त्यांचा विकास झाला आहे. आता हा धम्म मर्यादित ठेवून चालणार नाही तर प्रगती कडे गेलेल्यांनी इतरांना सुद्धा सोबत घेऊन मार्गक्रमण केले पाहिजे. भिमराव मेश्राम म्हणाले की, एका मॅनात एकच तलवार ठेवावी. म्हणून हिंदू की बौद्ध याचा विचार करून निर्णय घेतला पाहिजे. संग्राम घाटे म्हणाले की, बौद्धाशिवाय इतर सर्व जण देवावर विश्वास ठेवतात म्हणून त्यांचा विकास होत नाही. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला सुभाष ठोकळ, सुधीर सुरडकर, दिगंबर गायकवाड, मिलिंद बागूल, गोविंद कांबळे, रमाबाई कांबळे, दीक्षा कांबळे, अशोक मेश्राम, शैलेंद्र मिसाळ, एड. डी. बी. मेश्राम, संग्राम घाटे, भीमराव मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.